# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक -५०७९/२०२५**
**बोर्ड क्र.९४**

श्री. अमोल शिवाजी धस,
मु. पो. पांढरी, ता.जि. परभणी.
मो. नंबर-७७१८७७१८९५ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता (बांधकाम),
विभाग, जिल्हा परिषद, परभणी — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (बांधकाम),
विभाग, जिल्हा परिषद, परभणी. — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १७.०२.२०२६)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.१७.०२.२०२६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२७.०६.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०२२-२०२३ ते २०२४-२०२५ पर्यंत जिल्हा परिषद बांधकाम तर्फे टेंडर प्रक्रियेने झालेले सर्व कामाची सादर करणेबाबत. १. सर्व कामाची संचिका २. टेंडर प्रक्रीया ३. शासन निर्णय ४. वर्क ऑर्डर ५. एम.बी. ६. देखभाल दुरुस्ती व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावरदि.२५.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय घेऊन १५ दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती

अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहितीची मागणी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, नियमानुसार माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलाथी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. कार्यकारी अभियंता (बांधकाम), विभाग, जिल्हा परिषद, परभणी. यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.व्दि.अ. ५०७९/२०२५/4295 दिनांक : 08/04/2026